# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

---

दिनांक : २३/ १०/२०२०

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

### (घरगुती / सार्वजनिक नवरात्रौत्सवाबाबत)

कोव्हिड–१९ या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे उदभवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता यावर्षीचा नवरात्रौत्सव अत्यंत साध्या पध्दतीने साजरा करण्याबाबतचे आवाहन उल्हासनगर महानगरपालिका व शासन स्तरावरून करण्यात येत आहे. दिनांक २९/०९/२०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये दिलेल्या सुचना व दिनांक ०८/१०/२०२० रोजी महापालिका प्रशासन, पदाधिकारी, गटनेते व पोलिस अधिकारी यांचेसमवेत झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा केल्यानंतर महानगरपालिका क्षेत्रात घरगुती व सार्वजनिक नवरात्रौत्सव साजरा करणेसाठी खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना सर्वानुमते देण्यात येत आहे.

अ) <u>सर्वसाधारण सूचना (General Instructions)</u>

१. गरबा, दांडिया व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करू नयेत. त्याऐवजी आरोग्य विषयक उपक्रम/शिबीरे (उदा. रक्तदान) आयोजीत करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याद्वारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इत्यादी आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्मक उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी.

२. आरती, भजन, किर्तन व अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदीचे पालन करण्यात यावे.

३. देवीच्या मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रीनिंगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी प्रत्यक्ष येउन दर्शन घेवू इच्छिणाऱ्या भाविकांसाठी भौतिक अंतराचे (फिजीकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझार इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

४. मंडपात एकावेळी ५ पेक्षा जास्त कार्यकर्त्यांची उपस्थिती नसावी. तसेच मंडपामध्ये खाद्यपदार्थ अथवा पेय पानाची व्यवस्था करण्यास मनाई असेल.

५. दसऱ्याच्या दिवशी करण्यात येणारा रावण दहनाचा कार्यक्रम सर्व नियम पाळून प्रतिकात्मक स्वरूपाचा असावा. रावण दहनाकरिता आवश्यक तेवढया किमान व्यक्तीच कार्यक्रमास्थळी हजर हरातील. प्रेषक बोलावू नयेत. त्यांना फेसबुक इत्यादी समाज माध्यमातून थेट प्रक्षेपणाद्वारे बघण्याची व्यवस्था करावी.

६. कोव्हिड–१९ या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत पुनर्वसन, आरोग्य पर्यावरण, वैद्यकिय शिक्षण विभाग तसेच संबंधित महापालिका, पोलीस, स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या मार्गदर्शक सूचनांनंतर व प्रत्यक्ष उत्सव सुरू होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

७. नवरात्रौत्सव मूर्तीच्या विसर्जनावेळी ५ पेक्षा अधिक लोक असणार नाहीत व ते मास्क वापरतील आणि भौतीक अंतर पाळतील याची खबरदारी घ्यावी व कोणत्याही प्रकारची मिरवणूक काढण्यात येवू नयेत.

८. नवरात्रौत्सवाच्या विसर्जनाच्या तारखेस जर एखादया सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाचा परिसर हा कंटेटमेंट झोन जाहिर केला असेल तर त्या सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाने मंडपातच विसर्जनाची व्यवस्था करावी.

(कृ.मा.पा.)

९. देवीची मुर्ती शाडूची किंवा पर्यावरणपूरक असल्यास त्याचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे.

१०. घर/इमारत नवरात्रोत्सव कालावधी प्रतिबंधित क्षेत्र म्हणून जाहीर केल्यास प्रतिबंधित क्षेत्राकरिता असलेल्या नियमांचे पालन करण्यात यावे.

११. जर विसर्जनाच्या तारखेच्या दिवशी घरगुती देवी स्थित असलेली एखादया इमारत/चाळ जर "सिल्ड इमारत" मध्ये असेल तर त्यांनी विसर्जनासाठी घरगुती देवीची मुर्ती बाहेर घेवून जाऊ नये. त्यांना सदर देवीचे विसर्जन घरीच करावे.

१२. हाऊसींग सोसायटयांनी गृहसंकुलाच्या आवारात कृत्रिम हौद अथवा तत्सम व्यवस्था निर्माण करून देवीच्या मुर्तींचे विसर्जन करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सदर व्यवस्था करणेकरिता सेवाभावी संस्था व लोकप्रतिनिधी यांची मदत घ्यावी. याकरिता प्रभाग अधिकारी यांचे सहकार्य घेण्यात यावे.

१३. विसर्जनासाठी सार्वजनिक/घरगुती देवीची मुर्ती स्विकृती केंद्रे.

विसर्जनाचे दिवशी (दिनांक २५/१०/२०२० रोजी) सर्व भाविकांना/भक्तांना विनम्र निवेदन करण्यात येत आहे की शक्यतो, देवीच्या मुर्तींचे घरच्या घरीच व सार्वजनिक मंडळातील मुर्तींचे मंडपातच कृत्रिमरित्या तयार केलेल्या हौद/पाण्याच्या टाकीमध्ये विसर्जन करण्यात यावे. ज्या भक्तांना काही पर्याय नसल्यास त्यांनी देवीच्या विसर्जनाची आरती घरच्या घरीच/मंडळातच करून रात्री ९:३० वाजेपुर्वी देवींच्या मुर्ती हया महापालिकेद्वारे उभारण्यात आलेल्या खालील संकलन केंद्रावर जमा कराव्यात. त्यानंतर सदर मुर्तींचे महापालिकेमार्फत विधिवत विसर्जन करण्यात येईल. देवींच्या मुर्तींचे विसर्जनाकरीता जवळच्या ठिकाणी संकलनासाठी पर्याय निवडावा.

१. गोलमैदान, प्रभाग समिती क्र.१ कार्यालय, उल्हासनगर–४२१००१
२. एस.ई.एस.शाळा, खेमाणी उल्हासनगर–४२१००२
३. बोटक्लब, हिराघाट, उल्हासनगर–४२१००३
४. व्हिनस चौक, माणेरा गांव रोड, उल्हासनगर–४२१००४
५. कैलास कॉलनी, उल्हासनगर–४२१००५

१४. ध्वनी प्रदुषणाच्या अनुषंगाने विहित करण्यात आलेल्या नियमांचे पालन करून महापालिका/पोलीस प्रशासनास सहकार्य करावे.

१५. शासनाने महापालिका पोलीस प्रशासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

१६. वरील सर्व सूचनांचे पालन करून उल्हासनगर महानगरपालिकेला प्रशासनास सहकार्य करावे, जेणेकरून कोव्हिड–१९ च्या प्रादुर्भाव/प्रसार पासून आपण व आपले कुटुंब तसेच शहर सुरक्षित राहील असे आवाहन करण्यात येत आहे.

१७. उत्सवप्रसंगी सर्व भाविकांनी / नागरीकांनी अशी कोणतीही कृती करू नये. जेणेकरून कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव / फैलाव वाढेल. याअनुषंगाने सर्व भक्तांना व नागरीकांना आव्हानीत करण्यात येते की, कोव्हिड–१९ काळात वरील सर्व नियमांचे अनुपालन करावे व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(डॉ. युवराज भदाणे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका